| PUBLICATION | | Sakaal(Today) |
|---|---|---|
| DATE | | October 10th, 2018 |
| PAGE NO | | 05 |
| Edition | | Pune |

# एकांकिका स्पर्धेसाठी प्रवेशिका पाठवण्याचे आवाहन

**पुणे, ता. ९ :** थिएटर ॲकॅडमी, महाराष्ट्र सायबर पोलिस आणि क्विक हिल फाउंडेशन यांच्यातर्फे 'साय-फाय करंडक' या एकांकिका स्पर्धेचे आयोजन केले आहे. एकांकिकेच्या माध्यमातून सायबर सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण करणे हा यामागचा उद्देश आहे.

त्याअंतर्गत रंगकर्मी प्रसाद पुरंदरे हे राज्यभरातून विविध विभागांसाठी संघांची निवड करणार आहेत. हे संघ सायबर सुरक्षेवर आधारित एकांकिका स्पर्धेत सादर करणार आहेत. महाविद्यालये, स्वतंत्र गट आणि थिएटर संस्थांकडून स्पर्धेसाठीच्या प्रवेशिका १५ नोव्हेंबरपर्यंत स्वीकारण्यात येतील. करंडकाच्या अंतिम फेरीतील एकांकिकांचे सादरीकरण १६ डिसेंबर २०१८ रोजी होणार आहे, अशी माहिती क्विक हिल टेक्नॉलॉजीज्‌चे व्यवस्थापकीय संचालक कैलास काटकर यांनी दिली.